**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**

Web : www.dhepune.in E-mail : budget.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्रमांक-अर्थसं-२०१९-२०/वा.स्था.प्र.दे.भत्ता/लेखा-२/ 12081 दि.- सप्टेंबर २०१९

20 SEP 2019

**अत्यंत तातडीचे - ई-मेलद्वारे**

प्रति,

मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांच्या
अधिपत्त्याखालील सर्व शासकीय महाविद्यालये,
संस्था, वसतीगृहे, कार्यालये.

**विषय:- राज्य् शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार दिल्या जाणाऱ्या वाहतूक भत्ता, स्थानिक पूरक भत्ता तसेच प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याकरिता मागील ३ आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्षात आलेल्या रक्कमेबाबत.**

**संदर्भ:- १) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्र. क्र.१००/आस्था-२ दि.२०.०९.२०१९.**
**२) शासन पत्र वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१९/प्र. क्र.०४/सेवा-५ दि.१४.०८.२०१९.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्र दि.२०.०९.२०१९ व सहपत्रीत वित्त विभागाचे दि.१४.८.२०१९ च्या पत्राचे अवलोकन करावे. (प्रत सोबत सहपत्रीत केली आहे.) सदर पत्रानुसार शासनाने वाहतुक भत्ता, स्थानिक पुरकभत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याची सन २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ वर्षातील खर्चाची माहिती तातडीने सादर करण्याबाबत कळविले आहे.

सबब संदर्भाधीन पत्रानुसारची माहिती खालील तक्त्यात सॉफट कॉपी व हार्ड कॉपी अशा दोन्ही स्वरुपात **दिनांक-२१.९.२०१९ पर्यंत सकाळी ११:०० वाजेपर्यंत ई-मेलद्वारे** सादर करण्यात यावी. (शासकीय/अशासकीय माहीती सादर करावी.)

**लेखाशिर्ष:- 2202-----**

| अ. क्र. | उद्दिष्ट | ग्रेड पे निहाय | शहराचे वर्गीकरण | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाहतुक भत्ता | | | | | | |
| २ | स्थानिक पुरक भत्ता | | | | | | |
| ३ | प्रवास भत्ता व दैनिक भत्ता | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | |

टिप : - वरील माहिती बाबत वित्त विभागाचे दि.१४.०८.२०१९ च्या पत्राचे अवलोकन करावे.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

सोबत :- संदर्भीय पत्र व सहपत्रे.

## महाराष्ट्र शासन

तत्काळ

sushilkumar.shinde@nic.in

क्र.सकीर्ण -२०१९/प्र.क्र७०/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षाण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २०/९/२०१९

प्रति,

१)संचालक,उच्च/तंत्र/कला/ग्रंथालय संचालनालय.

विषय-राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार दिल्या जाणाऱ्या वाहतूक भत्ता,स्थानिक पूरक भत्ता तसेच प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याकरिता मागील ३ आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्षात आलेल्या रकमेबाबत.

संदर्भ-शासन निर्णय,वित्त विभाग,दि-११.१२.१९९८,१७.०६.२००५,दि-२४.०८.०९ दि-३.३.२०१०,व दि-५.२.२०१९

महोदय,

वित्त विभागाचे विभागाचे दिनांक १४/८/२०१९ चे पत्र सोबत जोडले आहे.

उपरोक्त विषयासंदर्भात संदर्भीय पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी अशा दोन्ही स्वरुपात या कार्यासनास मेल द्वारे तत्काळ सादर करावी,हि विनंती.

लेखा-१/२

आपला,

(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

सोबत-वरील प्रमाणे

e-5005036

**महाराष्ट्र शासन**

तात्काळ / समय मर्यादा

क्रमांक- संकीर्ण-२०१९/ प्र. क्र. ०४ /सेवा-५
वित्त विभाग,
तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १४.०८.२०१९

प्रति,

अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव,
पदुम विभाग / कृषि विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग / आदिवासी विकास विभाग / ग्रामविकास विभाग / सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग / वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग / शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.

**विषय :-** राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार दिल्या जाणाऱ्या वाहतूक भत्ता, स्थानिक पुरक भत्ता तसेच प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याकरीता मागील ३ आर्थिक वर्षांमध्ये प्रत्यक्षात आलेल्या खर्चाच्या रकमेबाबत......

**संदर्भ :** शासन निर्णय, वित्त विभाग, दि.११.१२.१९९८, दि.१७.०६.२००५ व दि.२४.०८.२००९, दि.०३.०३.२०१० तसेच दि.०५.०२.२०१९

महोदय,

शासन अधिसूचना वित्त विभाग, दि.३०.०१.२०१९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्स व वेतन स्तर या संकल्पनेनुसार दि.०१.०१.२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणीत लागू करण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केला असला तरी त्यांना दिला जाणारा वाहतूक भत्ता हा सहाव्या वेतन आयोगाच्याच दराने अदा करण्यात यावा, याबाबतचा उल्लेख उपरोक्त संदर्भीय दि.०५.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये करण्यात आला आहे.

२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०७.२०१९ रोजी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ मुंबई तसेच राज्य सरकारी मध्यवर्ती संघटना व मंत्रालयातील वरीष्ठ भाप्रसे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या संयुक्त बैठकीत विषयांकित मागणीवर सातव्या वेतन आयोगात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली. सदर चर्चेच्या अनुषंगाने उचित प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्रधान सचिव (ले. व को.) यांनी दिले आहेत.

३. उपरोक्त परिच्छेदातील आदेशास अनुसरुन राज्य शासकीय कर्मचारी व १०० टक्के अनुदानित संस्थामधील

(५) उच्च व तंत्र शिक्षण
७०

कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणीमध्ये वाहतूक भत्ता, स्थानिक पुरक भत्ता व प्रवास भत्ता तसेच दैनिक भत्ता मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव, वरीष्ठ स्तरावर सादर करण्यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार सदरहू कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येणाऱ्या वाहतूक भत्याच्या रकमेपोटी दरवर्षी किती कोटी रुपये खर्च राज्य शासनास येतो, याबाबतची, आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील १०० टक्के अनुदानित संस्थेमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना अदा झालेली रक्कम, आपल्या विभागाच्या म्हापसू प्रणाली / साऊ सेवार्थ / एचटीई सेवार्थ / आश्रमशालार्थ / पंचायतराज सेवार्थ / समाजसेवार्थ / आयुवेदार्थ / शालार्थ या प्रणालीवरुन तथापि खाली निर्देशित केल्यानुसार, या विभागास हे पत्र प्राप्त झाल्यापासून कोणत्याही परिस्थितीत दोन दिवसाच्या आत खास दूतामार्फत पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती.

i) वाहतूक भत्ता :- शासन निर्णय वित्त विभाग दि.०३.०६.२०१४ व दि.०४.०६.२०१४ विहीत केल्यानुसार ग्रेड पे निहाय व शहराचे वर्गीकरण निहाय, वाहतूक भत्त्याची रक्कम अदा करण्यासाठी, १०० टक्के अनुदानित संस्थातील कर्मचाऱ्यांना सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या तीन आर्थिक वर्षामध्ये किती कोटी रुपये खर्च आला, त्याबाबतची आर्थिक वर्षनिहाय माहिती.

ii) स्थानिक पुरक भत्ता :- १०० टक्के अनुदानित संस्थातील कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि.११.१२.१९९८ तसेच दि.१७.०६.२००५ मधील तरतुदीनुसार ग्रेड पे निहाय व शहर वर्गीकरणानुसार, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या तीन आर्थिक वर्षामध्ये स्थानिक पुरक भत्याची रक्कम अदा करण्यासाठी, किती कोटी रुपये खर्च आला, त्याबाबतची आर्थिक वर्षनिहाय रक्कम।

iii) प्रवासभत्ता व दैनिकभत्ता :- शासन निर्णय वित्त विभाग दि.०३.०२.२०१० मध्ये नमुद केल्यानुसार गट-अ, गट-ब, गट-ब(अराजपत्रित), गट-क व गट-ड या वर्गीकरणानुसार, ग्रेड पे निहाय, प्रवासाचे माध्यमनिहाय (विमानप्रवास, रेल्वेप्रवास, रस्ताप्रवास, बोटप्रवास ) शासकीय दौऱ्याच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांस मंजूर झालेला प्रवासभत्ता व दैनिकभत्ता याबाबत सन २०१६ ते २०१९ या ३ आर्थिक वर्षामध्ये अदा झालेली रक्कम, त्याशिवाय कायम प्रवास भत्ता, बदली प्रवास भत्ता, संयुक्त बदली अनुदान व बांधाबांधभत्ता याकरीता सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षामध्ये किती खर्च आला त्याबाबतची आर्थिक वर्षनिहाय रक्कम.

२. तरी वर नमूद केल्यानुसार मुद्देनिहाय माहिती शासनास दोन दिवसाच्या आत खास दूतामार्फत पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(श्री. दे. लोंढे)
अवर सचिव, वित्त विभाग